**राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ कडे निवेदने सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक-वेपूर-१२१७/प्र.क्र.२४/सेवा-९**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०१ मार्च, २०१८

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दि.१७.०१.२०१७.
२) शासन निर्णय क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दि.१७.०७.२०१७.

**<u>परिपत्रक</u>**

केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचा-यांना विहित केलेल्या वेतनश्रेण्यांच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करण्याकरिता राज्य शासनाने श्री.के.पी.बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव याच्या अध्यक्षतेखाली दि.१७.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ गठीत केली आहे. तसेच शासन निर्णय दि.१७.०७.२०१७ अन्वये या समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना वेतन सुधारणेसंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या विचारार्थ निवेदने सादर करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केल्याप्रमाणे ऑनलाईन पोर्टल (http://www.mahaseventhpay.in) दि.०७.०२.२०१८ रोजी रात्री १२.०० वाजेपासून कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर वेबपोर्टलची लिंक व त्याबाबतची जाहीर सूचना राज्य शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या पोर्टलवर पात्र कर्मचारी / अधिकारी संघटना व इतरांनी दि.०७.०२.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीत निवेदने सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

यासंदर्भात काही कर्मचारी संघटनांकडून वेतन सुधारणेसंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या विचारार्थ निवेदने सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच काही संघटनांनी ऑनलाईन पद्धतीने निवेदन सादर करता आले नाही अशांना प्रत्यक्षपणे ऑफलाईन पद्धतीने निवेदन सादर करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. काही संघटनांनी अशा स्वरूपाची मागणी वित्त विभागात प्रत्यक्ष भेटून केली आहे.

विविध संघटनांनी केलेल्या मागण्या विचारात घेऊन ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य वेतन सुधारणा समिती,२०१७ कडे ऑनलाईन पद्धतीने मागण्या नोंदविण्याकरिता

निर्धारित केलेली दि.२८.०२.२०१८ ही मुदत दि.१५.०३.२०१८ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सर्व विभाग प्रमुखांनी सदर बाब त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय, जिल्हास्तरीय,तालुकास्तरीय व अन्य क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांच्या निर्दशनास आणून द्यावी.

राज्य वेतन सुधारणा समिती,२०१७ कडे ऑफलाईन पद्धतीने प्राप्त होणा-या कोणत्याही निवेदनाची समितीकडून दखल घेतली जाणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०३०११७२५४२७००५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2018.03.01 17:26:01 +05'30'

**(भा.ज.गाडेकर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन,मुंबई,
४. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
५. सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
७. सचिव, महाराष्ट्र विधआनमंडळ सचिवालस, मुंबई,
८. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान,मुंबई-१९,
९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश,सी.डी.ओ.,बॅरेक क्र.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चोक, नरिमन पॉईंट,मुंबई-२०,
१०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेलरोड,मुंबई-४,
११. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मील पॅलेस, वरळी, मुंबई.
१२. इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५.